




दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : २१२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.१५ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## गॅस सिलिंडरसाठी मुंबईसह उपनगरांतील नागरिक हैराण

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, मुंबई :** गॅस सिलिंडरची उपलब्धता कमी होण्याची शक्यता असल्याने शहर आणि उपनगरांतील सर्वसामान्यांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे. यापूर्वी कधी सिलिंडर संपला तर शेजारधर्माचे पालन करून तो हक्काने दिला-घेतला जायचा. आता अनेक ठिकाणी त्यात 'ब्लॅक'चे व्यवहार सुरू झाले आहेत.

सिलिंडरच्या मूळ किंमतीपेक्षा दुप्पट पैसे दिले तर सिलिंडरची उपलब्धता करून देऊ असे स्पष्टपणे सांगितले जात आहे. ज्या कुटुंबामध्ये पाचपेक्षा अधिक सदस्य आहेत त्यांना सिलिंडरची उपलब्धता मिळताना विलंब होतो तर ज्या कुटुंबामध्ये तुलनेने कमी सदस्य आहेत त्यांना किमान २५ दिवसांनी सिलिंडर मिळण्याची खात्री वाटते. इतरांना ती शाश्वतीही नाही. त्यामुळे अचानक सिलिंडरची उपलब्धता संपली तर काय करायचे या प्रश्नाने मुंबईसह उपनगरांतील स्थानिक बेहाल झाले आहेत.

वाशीनाका येथे राहणाऱ्या स्मिता पवार यांच्या घरात सात सदस्य आहेत. त्यांना एक सिलिंडर किमान २५ दिवस जातो. किंमती वाढल्यापासून त्या सिलिंडर संपण्यापूर्वी एखादा आठवडा बुकिंग करतात. मात्र यावेळी त्यांनी २० दिवस आधीच बुकिंग केले असले तरीही सिलिंडर कधी येईल याची खात्री नाही. कॉलसेंटरला फोन केल्यानंतर तिथून कोणताही प्रतिसाद मिळत नाही तसेच बुकिंगही त्वरित होत नाही. फोन लगेच कट होतो, असे त्या सांगतात. ज्यांचे ऑनलाइन किंवा फोनवर बुकिंग होत नाही त्यांनी रिकामे सिलिंडर घेऊन गॅस सिलेंडरच्या नोंदणी केंद्रांकडे धाव घेतली आहे. तिथे गेल्यानंतर ऑनलाइन नोंदणी केली का, अशी विचारणा होत असल्याने या संभ्रमात भर पडली आहे.

तीस टक्के हॉटेल, उपाहारगृहे बंद

व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या टंचाईचा फटका आता मुंबईतील हॉटेल आणि रेस्टॉरंट व्यवसायाला बसू लागला आहे. शहरातील जवळपास ३० टक्के हॉटेल आणि उपाहारगृहे बंद ठेवावी लागली असून अनेक ठिकाणी मर्यादित वेळ आणि कमी मेन्यूसह सेवा सुरू ठेवली जात आहे. तर छोट्या खाणावळींनी कोळशाचा पर्याय निवडत



या संकटातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला आहे.

केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने व्यावसायिक एलपीजीच्या सरासरी मासिक गरजेपैकी सुमारे २० टक्के गॅस उपलब्ध करून देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या घोषणेमुळे काहीसा दिलासा मिळण्याची आशा असली तरी हा गॅस प्रत्यक्षात बाजारात किती लवकर उपलब्ध होतो, याकडे व्यवसायिकांचे लक्ष लागले आहे.

हॉटेल आणि रेस्टॉरंट संघटनांनी सदस्यांना काही तात्पुरत्या उपाययोजना सुचवल्या आहेत. उपलब्ध गॅसचा काटकसरीने वापर करणे, जास्त गॅस लागणारे पदार्थ तात्पुरते मेन्यूमधून कमी करणे, शक्य असल्यास इंडक्शन कुकर किंवा विजेवर चालणारी उपकरणे वापरणे आणि गर्दीच्या वेळांवर लक्ष केंद्रित करून कामकाजाची वेळ ठरवणे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच घाबरून मोठ्या प्रमाणात सिलिंडर साठवू नयेत, असे आवाहनही करण्यात आले आहे. अशा प्रकारची साठेबाजी केल्यास बाजारातील परिस्थिती आणखी बिघडू शकते, असा इशाराही देण्यात आला आहे.

## परळीत १६ वर्षीय मुलीवर सामूहिक अत्याचार




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, बीड :** परळी तालुक्यातील धारावती तांड्यावर एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर झालेल्या पाशवी अत्याचारामुळे संपूर्ण जिल्हा हादरून गेला आहे. ओळखीचा फायदा घेत दोन नराधमांनी पीडितेचे हातपाय बांधून आणि तोंडावर बोळा कोंबून अत्यंत क्रूरपणे अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेनंतर परिसरात संतापाची मोठी लाट उसळली असून, परळी ग्रामीण पोलिसांनी पोक्सोसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. सध्या दोन्ही आरोपी फरार असून, त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांची विशेष पथके रवाना झाली आहेत.

**● गोडीने बोलावून केला पाशवी अत्याचार**

मिळालेल्या माहितीनुसार, धारावती तांड्यावर राहणाऱ्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला दोन नराधमांनी गोडीने घरी बोलावले. त्यानंतर त्यांनी घराचा दरवाजा बंद करून, पीडितेचे हातपाय बांधले आणि तोंडात कपड्याचा बोळा कोंबला. त्यानंतर या नराधमांनी तिच्यावर पाशवी अत्याचार केला. अत्याचारानंतर, कोणाला काही सांगितले तर तुला जीवे मारून टाकीन, अशी धमकी देत त्यांनी पीडितेला सोडून दिले.

**● पालकांचा धाडसपूर्ण पवित्रा आणि गुन्हा दाखल**

पीडित मुलीने घरी परतल्यानंतर घडलेला सर्व प्रकार आपल्या आई-वडिलांना सांगितला. आपल्या मुलीवर ओढवलेला प्रसंग ऐकून पालकांनी कोणताही विलंब न करता थेट परळी ग्रामीण पोलीस ठाणे गाठले आणि तक्रार नोंदवली.

या घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी तत्काळ कारवाई केली. दोन्ही आरोपींविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ६४, १२७(२), ३५१(२), ३५२, ३(५) आणि बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या (POCSO) कलम ४ व १७ अन्वये गुन्हा (गु.र.नं. १२५/२०२६) दाखल केला आहे.

**● आरोपी फरार, पोलिसांकडून शोध मोहीम सुरू**

गुन्हा दाखल होताच पोलिसांचे पथक आरोपींच्या शोधात घटनास्थळी पोहोचले. मात्र, पोलिसांच्या हालचालींची कुणकुण लागताच दोन्ही आरोपी फरार झाले. सध्या अंबाजोगाई उपविभागाचे 'पिंक पथक' आणि सहायक पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांच्या नेतृत्वाखालील टीम आरोपींचा कसून शोध घेत आहे. या धक्कादायक घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून, आरोपींना लवकरात लवकर अटक करून कडक शासन करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## शिधावाटप विभागाची धडक कारवाई, वरळीत गॅस सिलिंडरचा काळाबाजार उघड

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, मुंबई :** वरळी परिसरात घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलिंडरचा काळाबाजार करणाऱ्या टोळीवर शिधावाटप विभागाने धडक कारवाई करत मोठा साठा जप्त केला. रहिवासी भागात धोकादायक पद्धतीने सिलिंडर साठवून काळ्या बाजारात विक्री केली जात असल्याचा प्रकार या कारवाईत उघडकीस आला.

नियंत्रक शिधावाटप कार्यालयाच्या फिरत्या पथकाने आणि कार्यालय क्रमांक २१ च्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. वरळी नाका येथील गणपतराव कदम मार्गावरील 'सूरज वल्लभदास चाळ' परिसरात गॅस सिलिंडरची अवैध साठेबाजी करून चढ्या दराने विक्री केली जात असल्याची गोपनीय माहिती प्रशासनाला मिळाली



होती. त्यानुसार पथकाने तातडीने छापा टाकत अवैधरित्या साठवलेले सिलिंडर जप्त केले.

या कारवाईत एचपी गॅस कंपनीचे पाच किलोचे सहा भरलेले आणि ५८ रिकामे सिलिंडर हस्तगत करण्यात आले. तसेच सुपर गॅस कंपनीचे चार किलोचे ६४ भरलेले आणि १२ किलोचे १९ भरलेले सिलिंडर जप्त करण्यात आले. याशिवाय १२, चार आणि दोन किलोचे विविध आकाराचे २५ रिकामे सिलिंडरही सापडले.

हे सिलिंडर बेकायदेशीररीत्या रिफिलिंग करून काळ्या बाजारात विकण्यासाठी ठेवण्यात आले होते, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. जप्त करण्यात आलेला सर्व मुद्देमाल पुढील फौजदारी कारवाईसाठी वरळी पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आला आहे. रहिवासी भागात अशा प्रकारे सिलिंडर साठवणे आणि त्यांची बेकायदेशीर विक्री करणे अत्यंत धोकादायक असून त्यामुळे नागरिकांच्या जीवितास मोठा धोका निर्माण होऊ शकतो, असे प्रशासनाने स्पष्ट केले.

ही कारवाई नियंत्रक शिधावाटप चंद्रकांत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गॅस सिलिंडरचा काळाबाजार करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असून अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी विभागाची पथके २४ तास सतर्क असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

## सोयगाव-बहीरोबा मार्गाची दुरवस्था; तात्काळ दुरुस्तीची नागरिकांची मागणी




**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.१४, सोयगाव :** सोयगाव ते बहीरोबा महाराज संस्थान जोडणाऱ्या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असून ठिकठिकाणी मोठे खड्डे पडल्याने हा मार्ग पूर्णपणे खराब झाला आहे. गेल्या दोन महिन्यांपासून रस्त्याचे बांधकाम काम बंद असल्यामुळे नागरिक व भाविकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित विभागाने तात्काळ काम सुरू करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. त्यामुळे चैत्यपूर्ण जोशी यात्रा असते लोणीचा भैरवनाथ मंदिर म्हणून बारा गाड्या त्यामुळे रस्त्याच्या व गावकरी यांनी नाराजी व्यक्त करण्यात आली.

सोयगावपासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर बहिरोबा (भैरवनाथ) बाबांचे जागृत देवस्थान असून मराठवाडा, खान्देश व विदर्भातील हजारो भाविकांचे ते श्रद्धास्थान आहे. या रस्त्याने दररोज शेकडो भाविक दर्शनासाठी ये-जा करतात. तसेच परिसरातील शेतकरी शेतातील कामांसाठी या मार्गाचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. मंदिर परिसरात वर्षभर लहान-मोठे अन्नदानाचे कार्यक्रमही होत असतात.

दरवर्षी चैत्र शुद्ध पौर्णिमेला हनुमान जयंतीनिमित्त येथे विशेष धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. या वेळी बारा गाड्या ओढण्याची परंपरा तसेच डाळ-बट्टीचा नवस फेडण्याचे कार्यक्रम पार पडतात. त्यामुळे या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होत असते.

सध्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे वाहनधारकांना जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागत आहे. रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. वारंवार अपघात होत असून एखादी मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या रस्त्यासाठी विशेष रस्ते विकास निधीतून सोयगाव ते बहीरोबा महाराज या तीन किलोमीटर मार्गासाठी सुमारे ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. दोन महिन्यांपूर्वी रस्त्याच्या साईड पट्ट्यांची खोदाई करून मुरूम टाकण्यात आला, मात्र त्यानंतर काम पूर्णपणे बंद पडले आहे. अचानक काम का थांबले, याबाबत परिसरात विविध चर्चा सुरू आहेत.

नागरिकांनी मागणी केली आहे की केवळ डागडुगी न करता संपूर्ण रस्ता खोदून त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करून ३१ मार्च २०२६ पर्यंत काम पूर्ण करावे. अन्यथा संबंधित कंत्राटदारावर नियमानुसार कडक कारवाई करावी. दरम्यान, लवकरात लवकर काम सुरू न झाल्यास नागरिक आंदोलन छेडण्याचा इशाराही देत आहेत.

## गॅस दरवाढीसह टंचाईवरुन सरकारविरुद्ध काँग्रेसचे विदर्भात आंदोलन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, बुलढाणा :** आखाती देशातील युद्धाचे परिणाम महाराष्ट्रातील जनतेलाही भोगावे लागत आहेत. इंधनाचा तुटवडा भासण्याची शक्यता असतानाच गॅस सिलिंडरची केंद्र सरकारने दरवाढ केल्याने काँग्रेसने गुरुवारी विदर्भाच्या सर्वच जिल्ह्यांत आंदोलन केले. या आंदोलनांत पक्षातर्फे सरकारच्या धोरणाविरोधात घोषणा देण्यात आल्या.

केंद्र सरकारने गॅस सिलिंडरच्या दरात ६० रुपयांची वाढ केल्याने जनतेत रोष निर्माण झाला आहे. केंद्रात सत्तेत आल्यापासून सरकारने आजवर किमान ५०वेळा गॅस सिलिंडरच्या दरात वाढ केली आहे. काँग्रेसच्या काळात ४०० रुपयांवर असलेला गॅस सिलिंडर आता ९०० रुपयांवर पोहोचला आहे. तसेच व्यावसायिक सिलिंडरही गेल्या आठवडाभरात १५० रुपयांनी महाग झाल्याने त्याची किंमतही १ हजार ९००च्या जवळपास पोहोचली आहे.

एकीकडे महिलांना 'लाडकी बहीण' म्हणायचे आणि दुसरीकडे महिलादिनाच्या एक दिवस आधी दरवाढ लादून दरवाढीची भेट देण्याचा सरकारचा दुपट्टीपणा समोर आला आहे. गॅस दरवाढीमुळे सर्वसामान्यांच्या घरातील बजेट कोलमडले असून लाडक्या बहिणींवर चूल पेटवण्याची वेळ आली आहे. हेच का केंद्र सरकारचे अच्छे दिन, असा संतप्त सवाल या आंदोलनादरम्यान काँग्रेसतर्फे करण्यात आला.

चिखली तहसीलदारांना घेराव !

बुलढाणा : जिल्ह्यातील चिखली येथे तहसील कार्यालय परिसरात गॅस सिलिंडरची प्रतीकात्मक अंत्ययात्रा काढण्यात



आली. तर महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी चुलीवर भाकरी थापून सिलिंडर दरवाढीचा तसेच सिलिंडर मिळत नसल्याचा निषेध नोंदवला. जिल्ह्यात तालुकास्तरावर काँग्रेस कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. चिखली येथील आंदोलनात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे यांनी, अमेरिका ठरवेल ते आपल्या देशाचे धोरण झाले आहे. त्यामुळेच युद्धाच्या पार्श्वभूमीवर ही दरवाढ करण्यात आली आहे. या युद्धाचा अंदाज आलेला असतानाही सरकारला नियोजन करता आले नाही. यावरून या सरकारची धोरणे कशी तकलादू आहेत, हेच स्पष्ट झाल्याची टीका त्यांनी केली. दरम्यान, आंदोलकांचे निवेदन स्वीकारण्यासाठी चिखलीचे तहसीलदार कार्यालयाबाहेर न आल्याने पदाधिकारी आक्रमक झाले. कार्यकर्त्यांनी तहसीलदारांना घेराव घातला. या आंदोलनात रामभाऊ जाधव, अतहरोद्दीन काझी, अंबादास वाघमारे, शहराध्यक्ष जाकीर शेख, संगीता गाडेकर, विद्या देशमाने, खलील बागवान, अशोक पडघान, पांडुरंग भुतेकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## मार्चमध्येच पाणी पाणी!

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, पुणे :** उन्हाळा सुरू झाल्याने पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदाच्या वर्षी फेब्रुवारी महिन्यातच टँकरची मागणी साडेसहा हजारांनी वाढली असून, मार्चच्या अखेरीस यामध्ये अधिकच वाढ होण्याची शक्यता आहे. फेब्रुवारी महिन्यात ४६ हजार ०६८ टँकरच्या फेऱ्या झाल्या आहेत. गेल्या वर्षी २०२४-२५ च्या फेब्रुवारीमध्ये ३९ हजार ४८८ टँकर सुरू होते, तर २०२३-२४च्या फेब्रुवारीत ३३ हजार ९५१ टँकर सुरू होते.

उन्हाळ्यात पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढते. डिसेंबरपासूनच शहरातील विविध भागात टँकरची मागणी वाढण्यास सुरुवात झाली आहे. जानेवारी, फेब्रुवारी महिन्यात टँकरची मागणी वाढत आहे. धनकवडी, कात्रज, कोंढवा, येवलेवाडी, किरकिटवाडी, वडगाव बुद्रुक, धायरी, वाघोली, धानोरी, लोहगाव, सूस, पाषाण आदी उपनगरे व समाविष्ट गावांच्या भागातून टँकरची मागणी वाढण्यास सुरुवात झाली आहे.

अक्षराज



# थोडे मिळविले, बरेच गमविले!



भारतीय अर्थव्यवस्थेने आर्थिक आघाडीवर बरेच विक्रम नोंदविले आहेत. आज आर्थिक वाढीच्या संदर्भात भारत आघाडीवर आहे. भारताचा आर्थिक वाढीचा दर सुमारे ७ टक्के एवढा आहे. जगातील कोणत्याही देशात तो ४ टक्के एवढाही नाही. भारतात महागाई वाढण्याचा दर वर्षाला १ टक्क्यापेक्षा कमी नोंदविण्यात आला आहे. चालू खात्यावरील तूट एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपीच्या) सुमारे एक ते दीड टक्का एवढी कमी आहे. परकीय चलनाचा साठा ६८० ते ७०० बिलियन डॉलर एवढा प्रचंड आहे. हा साठा सुमारे ११ महिन्यांची वस्तूंची आयात करण्यासाठी पुरेसा आहे. परकीय चलनाचा एवढा प्रचंड साठा भारतात पहिल्यांदाच जमा झाला आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताकडून अमेरिकेत आयात होणाऱ्या वस्तूंवर पन्नास टक्के एवढा टेरिफ लादून भारताची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयास केला आहे. परंतु नोव्हेंबर २०२५ या महिन्याची भारताच्या निर्यातीची आकडेवारी पाहिली, तर भारताकडून अमेरिकेला निर्यात होणाऱ्या वस्तूत वाढ झाल्याचे भारत सरकारने प्रसिद्ध केलेली आकडेवारी दर्शविते. तसेच भारत हा चीनप्रमाणे जागतिक बाजारपेठेत वस्तूंची प्रचंड प्रमाणावर निर्यात करणारा देश नाही. भारत प्रामुख्याने इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी क्षेत्रात सेवा पुरविणारा आघाडीचा देश आहे. भारतातील टीसीएस, इन्फोसिस, विप्रो अशा कंपन्या जगात सेवा पुरवून चांगला नफा मिळवितात. त्यामुळे भारताला भरपूर परकीय चलनाचा पुरवठा होतो. तसेच भारतातील उच्चशिक्षित लोकांना गलेलठ्ठ पगाराच्या नोकऱ्या मिळतात.

गेल्या चार-पाच वर्षांत भारताने वस्तूंच्या निर्यातीत वाढ होण्यासाठी काही उपक्रम राबविले आहेत. त्यातील सर्वांत महत्त्वाची योजना म्हणजे प्रॉडक्शन लिंक इन्सेंटिव्ह स्कीम ही होय. या उपक्रमामुळे आयफोन आणि स्मार्टफोन यांच्या निर्यातीत लक्षणीय प्रमाणात वाढ झाली आहे. परंतु लेबर इन्सेंटिव्ह क्षेत्राच्या निर्यातीत वाढ झालेली नाही. कापड उद्योग, तयार कपड्यांचा उद्योग, पादत्राणे इत्यादी वस्तूंच्या निर्यातीत वाढ झालेली नाही. असे उद्योग श्रम सघन म्हणजे मोठ्या प्रमाणावर अकुशल व अर्धकुशल रोजगार निर्माण करणारे असल्यामुळे या उद्योगांची वाढ झाल्यास देशातील बेरोजगारीची समस्या कमी होऊन हळूहळू कामगारांच्या वेतनात वाढ होणे संभवते. परंतु चीन, व्हिएतनाम, बांगलादेश यांच्याप्रमाणे भारतात श्रम सघन उद्योगांच्या वाढीची प्रक्रियेने मूळ धरलेले नाही. भारत हा कापूस उत्पादन करणारा देश आहे. परंतु कापसाची वस्त्रे बनविण्याचे काम भारतात मोठ्या प्रमाणावर होत नाही.

भारत कापूस किंवा कापसाचा धागा निर्यात करतो आणि चीन, व्हिएतनाम, बांगलादेश यांसारखे देश कापूस वा कापसाचा धागा भारतातून आयात करून गडगंज नफा कमावतात! आणि आपण हात चोळत सदर देशांच्या विकासाची प्रक्रिया पाहत राहतो. गेले काही दिवस बांगलादेशात राजकीय अस्थैर्य होते. त्यामुळे कपडे तयार करणारे काही कारखाने बंद पडले आहेत. याचा फटका भारतातील काही उद्योगपतींना बसला आहे. कारण अशा बंद पडलेल्या कारखान्यांचे मालक भारतीय उद्योगपती आहेत. बांगलादेशाप्रमाणे व्हिएतनाममध्येही कपडे तयार करणाऱ्या उद्योगातील काही कारखाने भारतीय उद्योगपतींचे आहेत. अशा कारखान्यांमुळे बांगलादेश व व्हिएतनाम या देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते, तेथे रोजगार निर्मिती होते आणि सदर देशातील कारखान्यांचे मालक असणाऱ्या भारतीय उद्योगपतींना नफा मिळतो. आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या हा नफा कोणतीही महत्त्वाची भूमिका बजावीत नाही. भारत सरकारने भारतातील काही उद्योगपती बांगलादेश व व्हिएतनाम यासारख्या देशांत कारखाने का काढतात, हे जाणून घेऊन त्यांना भारताकडे आकृष्ट करण्यासाठी योग्य पाऊले उचलण्याची गरज अधोरेखित होते. भारतात वस्त्रे प्रावरणे, पादत्राणे यांच्या कारखान्यांच्या संख्येत वाढ झाल्यास देशात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल. आणि भारतातील बेरोजगारीची गंभीर समस्या विचारात घेता श्रम सघन उद्योगांच्या वाढीसाठी सरकारने दमदार पाऊले उचलणे गरजेचे ठरते.

डॉ. अरविंद पानगडिया या अर्थतज्ज्ञाने २०१९ साली प्रकाशित केलेल्या 'फ्री ट्रेड अँड प्रॉस्पेरिटी' या पुस्तकात विकसनशील देशाने आर्थिक समृद्धीसाठी वस्तूंच्या निर्यातीत वाढ करण्यासाठी जोरदार प्रयास करणे गरजेचे आहे. हे जगातील काही देशांचे उदाहरण घेऊन साधार स्पष्ट केले आहे. भारत सरकार वस्तूंच्या निर्यातीत करण्यासाठी प्रॉडक्शन लिंक इन्सेंटिव्हसारख्या योजना राबवीत असले, तरी त्यामुळे आयफोन आणि स्मार्टफोन यांच्या निर्यातीत लक्षणीय प्रमाणात वाढ झाली आहे. परंतु श्रम सघन उद्योगांच्या निर्यातीत फारशी वाढ झालेली नाही. त्यामुळे रोजगार निर्मितीत वाढ झालेली नाही. अशा सर्व बाबी साकल्याने विचारात घेऊन सरकारने श्रम सघन उद्योगांच्या वाढीसाठी दमदार पाऊले उचलण्याची गरज अधोरेखित होते.

भारतातील केंद्र सरकार महात्मा गांधी ग्रामीण रोजगार योजना राबविण्यासाठी वर्षाला सुमारे ९० हजार कोटी रुपये खर्च करते. राज्य सरकारे लाडकी बहीण योजना राबविण्यासाठी असेच वर्षाला हजारो कोटी रुपये खर्च करतात. अशा सर्व योजना अनुत्पादक आणि त्यामुळे सरकारच्या तिजोरीवर पडणारा भार आहेत. अशा उपक्रमांमुळे सत्ताधारी पक्षाला सत्तेचा गड राखण्यास मदत होत असली, तरी त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत नाही हे वास्तव आहे. अशा उपक्रमांना सुरुवात अलीकडेच झाली आहे आणि राजकारणाची गरज म्हणून अशा अनुत्पादक योजनांची व्याप्ती नजीकच्या भविष्यकाळात निश्चितपणे वाढणार आहे. लोकांना खाण्यासाठी मासे फुकट उपलब्ध करून देण्याऐवजी त्यांना मासे पकडायला शिकविणे हा पर्याय विवेकी आणि लोकांना स्वावलंबी बनविणारा आहे. परंतु राजकारणी मंडळींना लोकांना परावलंबी बनवून सत्तेची खुर्ची पटकावून भ्रष्टाचार करायचा आहे. लोक स्वावलंबी झाल्यास आजच्या बहुसंख्य सत्ताधाऱ्यांना घरी बसावे लागेल. त्यांना भ्रष्टाचार करता येणार नाही. त्यांचा उत्पन्नाचा स्रोत बंद पडेल. या भीतीमुळे रेवडी संस्कृती विस्तारत आहे. यापुढे रेवडी संस्कृतीचा न भूतो न भविष्यती असा विस्तार होईल, असेच चित्र दिसत आहे. ज्या ज्या राज्यांत नव्याने निवडणुका होऊ घातल्या आहेत, तिथे अशा योजनांची चलती दिसते. या योजनांनी अनेक पक्षांना सत्तेत येण्यास मोठा हात दिल्याने या योजना म्हणजे जणू सत्तेचा सोपान ठरल्या आहेत. पायाभूत सुविधांचा विकास, वस्तूंच्या निर्यातीत वाढ करण्यासाठी प्रोडक्शन लिंक इन्सेंटिव्ह यासारख्या योजना राबविण्यासाठी सरकारकडे पैसे उरणार नाहीत. त्यामुळे आर्थिक विकासाची प्रक्रिया ठप्प होईल. भविष्यात सुरू होणारा संभाव्य गोंधळ सुरू होण्यापूर्वी माझ्यासारखे बहुसंख्य वृद्ध निजधामास गेलेले असतील. त्यामुळे भविष्यकाळात आर्थिक समस्यांशी मुकाबला आज तरुण असणाऱ्या लोकांना करावा लागणार आहे. कामगार चळवळ आजच इतिहासजमा झाली आहे. एकंदरीत परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत आहे आणि याचे भान आज कोणालाही नाही. जगात सर्वत्र थोड्याफार प्रमाणात भारतासारखीच सामाजिक व राजकीय स्थिती आहे. कालाय तस्मै नमः!

**– रमेश पाध्ये**

# जागतिकीकरण विरुद्ध राष्ट्रवाद !

१९९० च्या दशकात जगभरात जागतिकीकरणाचे वारे सुसाट वाहू लागले. गॅट करारामुळे व्यापार आणि उद्योग क्षेत्रासाठी जगभरातील देशांमधील सीमा काही प्रमाणात खुल्या होऊ लागल्या. जागतिकीकरणाने एकूणच जगाची सर्व अंगांनी व्यवस्था बदलण्यास सुरुवात केली. उदारीकरण केवळ आर्थिक बाबतीतच झाले नाही, तर पुढे जाऊन विचार, संस्कृती, आहार आणि जीवनशैली अशा सर्व अंगांना व्यापणारे ठरले. यामधून अनेक सकारात्मक परिणाम झाले; परंतु त्याचबरोबर बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या माध्यमातून नववसाहतवाद निर्माण होण्याची भीतीही वाढू लागली. देशी सांस्कृतिक अस्मिता जपण्यासाठी जागतिकीकरणाविरुद्ध सांस्कृतिक राष्ट्रवाद अनेक देशांत निर्माण होऊ लागला. विशेष म्हणजे जागतिकीकरणाची फळे चाखणारेच लोक याविरुद्ध बोटे मोडताना दिसू लागले. ही दुटप्पी भूमिका अनेकांनी स्वीकारल्याचे दिसून येते.

आज अमेरिकेसारखे देश आणि त्यांचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प जेव्हा अमेरिका फर्स्ट ही घोषणा देतात, तेव्हा ती घोषणा नव-राष्ट्रवादाची मागणी करणारी आणि जागतिकीकरणाला विरोध करणारी ठरते. त्यांच्या धोरणांमध्ये राष्ट्रवादाचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. इतर देशांच्या मालावर मोठ्या प्रमाणात आयात शुल्क लावणे किंवा परदेशी लोकांवर निर्बंध आणणे, या धोरणांमुळे अमेरिकेला पुन्हा राष्ट्रवादी दिशेकडे वळवण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसते. त्यामुळे त्यांचा प्रवास जागतिकीकरणाकडून राष्ट्रवादाकडे सुरू असल्याचे जाणवते.

खरं तर राष्ट्रवाद ही एक मानसिक आणि भावनात्मक कल्पना आहे. राष्ट्रवाद हा देशभक्ती, देशप्रेम, जातीय, धार्मिक व भौगोलिक घटक, तसेच समान राजकीय महत्त्वाकांक्षा या धारणांमधून विकसित झाला आहे. राष्ट्रवाद प्रत्येकाला आपल्या देशावर प्रेम करण्याची प्रेरणा देतो. आधुनिक सार्वभौम राज्यव्यवस्थेचा आधारही राष्ट्रवादाला मानला जातो.

१९व्या शतकाच्या प्रारंभापासून राष्ट्रवाद ही एक प्रभावी राजकीय शक्ती बनू लागली. १८७१ पर्यंत इटली आणि जर्मनी यांचे एकीकरण झाले. राष्ट्रीयत्वाच्या आधारे राज्यांची निर्मिती होऊ लागली. पहिल्या महायुद्धानंतर झालेल्या पॅरिस शांतता करारामध्ये राष्ट्रांच्या स्वनिर्णयाच्या तत्त्वाला मान्यता देण्यात आली. एकजिनसी संस्कृती असलेल्या समाजाला स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचा हक्क देण्यात आला.

समान भाषा, समान धर्म, समान संस्कृती आणि समान इतिहास हे घटक लोकांमध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण करतात. राष्ट्रवाद ही एक उदात्त विचारसरणी असून ती व्यक्तीला एक अस्मिता प्रदान करते. देशाचा आर्थिक विकास आणि सांस्कृतिक जतन करण्याची प्रेरणा राष्ट्रवाद देतो. मात्र, अतिरेकी किंवा आत्यंतिक राष्ट्रवाद धोकादायक ठरतो. दुसरे महायुद्ध होण्यामागे अतिरेकी राष्ट्रवादही एक महत्त्वाचे कारण होते.

आज अमेरिकेतील राष्ट्रवादाची भूमिका प्रामुख्याने जागतिकीकरणामुळे आपल्यावर अन्याय होत असल्याच्या भावनेतून निर्माण होत आहे. परदेशी लोक आपल्या देशातील नोकऱ्या घेत आहेत, आपल्या उत्पादित मालाला आवश्यक बाजारपेठ मिळत नाही किंवा इतर देशांकडून जास्त आयात शुल्क लावले जाते, अशी कारणे देऊन जागतिकीकरणावर राष्ट्रवाद हा उपाय म्हणून मांडला जात आहे. याशिवाय राजकीय लोकप्रियता वाढवण्यासाठीही राष्ट्रवादाचा वापर केला जात असल्याचे दिसते.

आपली पारंपरिक संस्कृती आणि विचारधारा सर्वोत्तम आहेत, त्या दोषरहित आहेत आणि त्यांचे जतन केले पाहिजे, असा आग्रह राष्ट्रवादी विचारसरणी करते. देशाचे निर्णय देशातच घेतले जावेत, हा सार्वभौमत्वाचा विचार राष्ट्रवादाचा पाया मानला जातो. परंतु जागतिकीकरणामुळे जागतिक व्यापार संघटना (थढज) किंवा संयुक्त राष्ट्रसंघ यांसारख्या संस्थांच्या नियमांमुळे अनेकदा देशांच्या निर्णयांवर मर्यादा येतात. ही बाब राष्ट्रवादाला मान्य नसते.

जागतिकीकरणामुळे जगाची प्रगती होत असली, तरी त्यातून निर्माण होणारी आर्थिक विषमता आणि सांस्कृतिक आव्हाने यांमुळे अनेक देशांमध्ये पुन्हा एकदा प्रखर राष्ट्रवाद वाढताना दिसत आहे.जागतिकीकरणाला सुरुवातीला डाव्या विचारसरणीच्या लोकांनी विरोध केला होता, तर उजव्या विचारसरणीच्या लोकांनी त्याचे स्वागत केले होते. परंतु आज परिस्थिती उलट होताना दिसते. उजवे विचारसरणीचे गट जागतिकीकरणाला विरोध करून राष्ट्रवादाचा पुरस्कार करत आहेत, तर डाव्या विचारसरणीची भूमिका या विषयावर काहीशी गोंधळलेली दिसते.

प्यू ग्लोबल एटीट्यूडस या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात ४७ देशांतील सुमारे ४५ हजार लोकांच्या मुलाखती या सर्वेक्षणासाठी घेण्यात आल्या. जागतिकीकरण आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आपल्या देशात स्वागत करणाऱ्यांचे प्रमाण चीन आणि भारतात जास्त असल्याचे आढळले. चीनमध्ये ७३ टक्के, तर भारतात ६४ टक्के नागरिक परकीय कंपन्यांना अनुकूल आहेत. आश्चर्य म्हणजे जागतिकीकरणाचा पुरस्कार करणाऱ्या अमेरिकेत हे प्रमाण केवळ ४५ टक्के आहे, तर इटलीमध्ये ३८ टक्के आहे. ब्रिटन आणि फ्रान्समध्ये ते याहूनही कमी आहे. यावरून असे दिसते की प्रगत देशांचा जागतिकीकरणातील रस कमी होत चालला आहे.

आज जगात घडणारी युद्धे, हवामान बदलाबाबतची धोरणे, देशांतर्गत राजकारण तसेच आंतरराष्ट्रीय राजकारण या सर्वांमध्ये जागतिकीकरण आणि राष्ट्रवाद यांचा परस्पर संबंध दिसून येतो. जागतिकीकरणाचे फायदे घेतलेल्या भारतासारख्या देशाने जर जागतिकीकरणाकडून राष्ट्रवादाकडे अतिशय तीव्रपणे वळण घेतले, तर तो प्रवास आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या तोट्याचा ठरू शकतो.

**– किशोर जाधव,सोलापूर**
**– मो. नं. ९९२२८८२५४१**

## ग्राहक देव

शिकवणबापुजींची
ग्राहकां मानतो देव
राक्षस जागे प्रत्यक्ष
करता मात्र देव घेव

विक्रेतेचाणाक्ष असे
लयलूट करे अच्छेव
जाहिरात कराअशी
कुणालाही सुटे चेव

सणवारउत्सव येता
भ्रामकांचेफुटते पेव
लवाजमा सोबतीस
सजूनआले नवरदेव

अक्षराज

ग्राहक संतुष्ट व्हावा
हीचंआम्हा खरीठेव
गावरान ताजा माल
अक्षबंद विश्वासठेव

अन्यत्र शाखा नसते
दुकानमाझे एकमेव
लांबलचक रांगदिसे
तिथे उभे ग्राहक देव

ऑनलाइन सेवा घेई
नको फुका उठा ठेव
आगंतुक वर्दळ वाढे
रे सुरक्षेची भासे भेव

डिलिव्हरी बॉय येता
वाटेआलाय वासुदेव
घरगुती वातावरणात
हॉटेलचे आणून जेव

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# विनोद सम्राट दादा कोंडके

आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांचा काल म्हणजे १४ मार्च रोजी स्मृतिदिन होता. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त हा विशेष लेख. जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले. पण लहानपणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले. लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली. दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँड वाले दादा म्हणूनच लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले. वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. गावागावांतील रसिक प्रेक्षक दादांना ओळखू लागले. याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले. हा चित्रपट तिकिटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले. १९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देविया हा हिंदी चित्रपट लावला. आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा. शिवसैनिकांनी चित्रपटगृहात घातलेल्या राड्याने आणि बाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या पाहायला प्रेक्षकांच्या रांगा लागल्या. सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला. सोंगाड्यामुळे मरगळलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला ऊर्जितावस्था मिळाली. तमाशापटाला कंटाळलेल्या मराठी चित्रपट रसिकांना सोंगाड्यात दादांनी आपल्या विनोदाने मनमुराद हसवले. दादांच्या विनोदाला मराठी रसिकांनी मनमुराद दाद दिली. सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव. सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान वाढली होती. या लोकप्रियतेचा धसका हिंदी चित्रपट सृष्टीनेही घेतला होता. दादांनी एकटा जीव सदाशिव या चित्रपटाची घोषणा केल्यावर राज कपूर यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजे ऋषी कपूर साठी काढलेला बॉबी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली. सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात दादांनी अशोक



सराफ यांना संधी दिली. हा चित्रपटही यशस्वी ठरला मग काय त्यानंतर दादांच्या यशस्वी चित्रपटांची मालिकाच सुरू झाली. तुमचं आमचं जमल, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले. सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. त्यांच्या यशस्वी चित्रपटात त्यांच्या इरसाल विनोदाचा जितका वाटा होता तितकाच त्या चित्रपटातील श्रवणीय गाण्यांचा देखील होता. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. दादांचे चित्रपट जितके लोकप्रिय झाले तितकेच ते वादग्रस्तही ठरले. त्यांच्या सर्वच चित्रपटांना सेन्सॉर बोर्डने आडकाठी आणली मात्र दादांनी सेन्सॉर बोर्डाच्या या दंडेली पुढे कधीही नमते घेतले नाही उलट सेन्सॉर बोर्डशी त्यांनी कायम दोन हात केले. ज्या शिवसेनेमुळे त्यांचे चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले त्या शिवसेनेशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. आयुष्यभर त्यांनी शिवसेनेशी बांधिलकी राखली. १४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वाला सुवर्णकाळ दाखवणारा विनोदाचा सम्राट काळाच्या पडद्याआड गेला. मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. विनोद सम्राट दादा कोंडके यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## दिव्यांग लाभार्थ्यांनी यू.डी.आय.डी कार्ड संजय गांधी विभागास सादर करावे – तहसीलदार पाटील

**अक्षराज : प्रतिनिधी**




**दि.१४, बुलढाणा :** तहसील कार्यालय लोणार अंतर्गत संजय गांधी योजनेचा लाभ घेत असलेले व घेणार आहेत अश्या दिव्यांग लाभार्थ्यांनी यू.डी. आय.डी. कार्ड (UDID CARD) संजय गांधी विभाग तहसील कार्यालय लोणार येथे सादर करणे अनिवार्य आहे. तसेच डी. बी. टी. पोर्टला (DBT PORTAL) संलग्न करणे अनिवार्य आहे.तरी सर्व दिव्यांग लाभार्थी यांनी संजय गांधी विभाग लोणार येथे संपर्क साधावा.

संजय गांधी विभाग यांच्या कडे २० मार्च पर्यंत जमा करावे अन्यथा आपले लाभ वितरण खंडित करण्यात येईल याची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थी यांची राहील असे आव्हान लोणार तहसीलदार भुषण पाटील यांच्या सह नायब तहसीलदार मयुर इप्पर (महाराष्ट्र शासन तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार लोणार रा.सं.गा.यो) यांनी दिव्यांग बांधवांना केले आहे. या अहवानामुळे संजय गांधी योजनेचा लाभ घेत असलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना यू.डी.आय.डी कार्ड मिळविण्यास मदत होणार आहे.

## खडकवाडी येथे महाराजस्व समाधान शिबिराचे उद्घाटन

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** ग्रामीण भागातील नागरिकांच्या दैनंदिन अडचणी व शासनाच्या विविध योजनांबाबतची कामे तातडीने मार्गी लावण्यासाठी खडकवाडी (ता. पारनेर) येथे आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' कार्यक्रमाचे उद्घाटन पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते करण्यात आले.

या शिबिरामध्ये नागरिकांच्या सोयीसाठी महसूल विभागासह कृषी, पंचायत समिती, ग्राम पंचायत, आरोग्य, पशुसंवर्धन, समाजकल्याण, महिला व बालविकास, महावितरण, अन्न व नागरी पुरवठा, परिवहन (एस.टी.), शिक्षण तसेच इतर विविध शासकीय विभागांची माहिती देणारे स्वतंत्र टेबल लावण्यात आले होते. उपस्थित नागरिकांनी आपल्या शंकांचे निरसन करून विविध कामे मार्गी लावून घ्यावीत, असे आवाहन आमदार दाते सरांनी यावेळी केले.

यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, नागरिकांच्या दृष्टीने महसूल विभाग अत्यंत महत्त्वाचा असून तहसीलदारांनी उपस्थित नागरिकांना शासनाच्या महसूल विषयक योजनांची सविस्तर माहिती देऊन त्यांचा लाभ कसा घ्यावा याबाबत मार्गदर्शन करावे. महसूल प्रशासनाचे बहुतांश काम ऑनलाईन झाले असले तरी सातबारा नोंद, फेरफार आदी बाबतीत अनेक तक्रारी येतात. अशा तक्रारींवर या अभियानाच्या माध्यमातून महसूल प्रशासनाने ठोस कार्यवाही करावी, असे त्यांनी सांगितले.

> ● ग्लोबल वार्मिंगमुळे पावसाच्या अनियमिततेचा शेतीवर मोठा परिणाम होत असून पाण्याचे व पीक नियोजन करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. त्यामुळे शेतकरी व शेती अधिक समृद्ध व्हावी यासाठी कृषी विभागाच्या माध्यमातून पीक विमा योजना, सूक्ष्म सिंचन (ठिबक–तुषार) योजना, कृषी यंत्रीकरण, मृदा आरोग्य पत्रिका, फलोत्पादन विकास, शेतकरी सानुग्रह अनुदान अशा विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. आमदार काशिनाथ दाते सरांच्या माध्यमातून मागील वर्षात शेतकरी सानुग्रह अनुदान योजनेतून तालुक्यातील शेतकऱ्यांना पाऊणे दोन कोटी रुपयांहून अधिक मदत देण्यात आली आहे. तालुक्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या योजनांचा लाभ घ्यावा, त्यासाठी विभागाकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल.
>
> **– गजानन घुले (तालुका कृषी अधिकारी)**

कृषी विभागाविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, कृषीमंत्री दत्तामामा भरणे यांच्या कार्यकाळात विभागाच्या कामकाजाला मोठी गती मिळाली आहे. पारनेर तालुक्यात कृषी विभागाच्या कोणत्याही योजनेला निधी कमी पडू दिला जाणार नाही, शेतकऱ्यांनी विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आ. दाते यांनी केले. या शिबिरामुळे नागरिकांना विविध शासकीय सेवा व योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध झाली असून उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## आ. किशोर जोरगेवार यांच्या तत्परतेमुळे ७ गावांचा पाणीपुरवठा पुन्हा सुरू

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** एक महिन्यांपासून खंडित असलेल्या सात गावांच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न आ. किशोर जोरगेवार यांच्या तत्पर हस्तक्षेपामुळे अखेर सुटला असून गावकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. याबद्दल गावतील सरपच आणि शिखर समीतीच्या वतीने आ. किशोर जोरगेवार यांची भेट घेत आभार मानले आहे. यावेळी शिखर समीती अध्यक्ष प्रकाश शेंडे, चंदु माथने, प्रकाश अलवेलवार, नागाळा सरपंच शोभा चिमूरकर, शेणगाव सरपंच पुष्पा मालेकर, धानोरा सरपंच विजय आगरे, स्वप्निल शेडामे, सिदुर उपसरपंच संजय गनफाडे, यांच्यासह गावकऱ्यांची उपस्थिती होती.

चिंचाळा व सात गावे प्रादेशिक पाणीपूरवठा योजना अंतर्गत चिंचाळा, नागाळा, महाकुर्ला, वांढरी, धानोरा, सिदुर, व वेंढली या सात गावांना पाणीपुरवठा केला जात होता. मात्र, महावितरणचे वीजबिल थकीत असल्याने पंपिंग स्टेशनचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. त्यामुळे सातही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली होती.

या पार्श्वभूमीवर संबंधित गावांचे सरपंच आणि शिखर समितीचे अध्यक्ष यांनी आ. किशोर जोरगेवार यांची भेट घेऊन तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली. समस्या समजताच आ. जोरगेवार यांनी तत्काळ प्रशासनाशी संपर्क साधत गावांचे सरपंच, शिखर समितीचे प्रतिनिधी आणि महावितरणचे अधिकारी यांची संयुक्त बैठक घेण्याच्या सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकितसिंह यांना दिल्या.

त्याअनुषंगाने जिल्हा परिषदेत बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत १५ व्या वित्त आयोगाच्या बंदिस्त निधीतून वीजबिल भरण्यासाठी आराखडा सुधारित करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. त्यानुसार महावितरणकडे काही दिवसांची मुदतवाढ देण्याची विनंती करण्यात आली. महावितरणने ही मागणी मान्य करत वीजपुरवठा पुन्हा सुरू केला आहे. त्यामुळे पंपिंग यंत्रणा कार्यान्वित होऊन सातही गावांचा पाणीपुरवठा पुन्हा सुरळीत झाला आहे.

## ठाणेकरांसाठी टीएमटीच्या ताफ्यात दाखल होणार नव्याकोऱ्या ३६० बसेस

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१४, ठाणे :** ठाणेकरांना अधिक सोयीस्कर आणि आरामदायी सार्वजनिक वाहतूक उपलब्ध करून देण्यासाठी ठाणे महापालिकेच्या परिवहन विभागाने बस ताफा वाढवण्याची तयारी सुरू केली आहे. त्यानुसार येत्या मार्च २०२७ पर्यंत परिवहन सेवेत एकूण ३६० पर्यावरणपूरक बस दाखल करण्याची योजना आखण्यात आली आहे. यात इलेक्ट्रिक आणि सीएनजी बसचा समावेश असल्याने प्रवाशांना अधिक सुखद व गारेगार प्रवासाचा अनुभव मिळणार आहे.

गेल्या काही वर्षात ठाणे शहराची लोकसंख्या २२ लाखांच्या पुढे गेली असून सार्वजनिक वाहतुकीची मागणी सातत्याने वाढत आहे. मात्र उपलब्ध बससंख्या तुलनेने कमी असल्याने अनेक प्रवाशांना खासगी वाहन, रिक्षा किंवा इतर पर्यायांचा वापर करावा लागत आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन परिवहन प्रशासनाने बस ताफा वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय स्वच्छ हवा उपक्रमांतर्गत यापूर्वी ठाणे परिवहन सेवेत १२३ इलेक्ट्रिक बस दाखल करण्यात आल्या आहेत. या बसमध्ये १२ मीटर आणि ९ मीटर लांबीच्या बसचा समावेश आहे. या बसमुळे प्रवाशांना आरामदायी प्रवासासोबतच प्रदूषणमुक्त वाहतुकीचा लाभ मिळत आहे.

दरम्यान, नवीन आर्थिक वर्ष २०२६–२७ मध्ये परिवहन विभागाकडून आणखी बस खरेदी करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. पीएमई योजनेंतर्गत १०० इलेक्ट्रिक बस, १५व्या वित्त आयोगाच्या निधीतून १६० बस आणि महापालिकेच्या परिवहन विभागाकडून १०० सीएनजी बस घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या सर्व बस टप्याटप्याने ताफ्यात दाखल होणार असून मार्च २०२७ पर्यंत एकूण ३६० बस उपलब्ध होतील, असा विश्वास परिवहन प्रशासनाने व्यक्त केला आहे.

या नव्या बसमुळे शहरातील विविध मार्गावर बसफेऱ्यांची संख्या वाढवणे शक्य होणार आहे. तसेच प्रवाशांना कमी वेळात आणि अधिक सोयीस्कर सेवा मिळेल, असा दावा परिवहन विभागाने केला आहे.

यापूर्वीही कळवा आणि वागळे आगारातील ३३ जुन्या बसांचा ऑनलाइन लिलाव करण्यात आला होता. या लिलावात दिल्ली, मुंबई, हैदराबाद आणि बंगळुरू येथील व्यापाऱ्यांनी सहभाग घेतला होता. त्या लिलावातून परिवहन सेवेला सुमारे ८७ लाख रुपयांचे




उत्पन्न मिळाले होते. या निधीतून काही बससाठी आवश्यक स्पेअर पार्ट खरेदी करून काही बस पुन्हा दुरुस्त करण्यात आल्या होत्या.

परिवहन सेवेत १५ वर्षांहून अधिक काळ वापरात असलेल्या काही जुन्या डिझेल बस आता सेवाबाह्य करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यानुसार १७जुन्या बसांचा ऑनलाइन लिलाव नवीन आर्थिक वर्षात करण्याची तयारी प्रशासनाने केली आहे. आवश्यक शासकीय परवानग्या मिळाल्यानंतर ही लिलाव प्रक्रिया लगेचच सुरू केली जाईल असे भालचंद्र बेहेरे, व्यवस्थापक ठाणे परिवहन सेवा यांनी माध्यमांना सांगितले.


## ऐरोलीत अनधिकृत बांधकामाविरोधात धडक मोहिम

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि१४, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड, यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई केली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली कार्यालया अंतर्गत एसएस– २/ बी २२९, सेक्टर २, ऐरोली, नवी मुंबई येथे बबन बाबू पवार, गुफरान खान (ठेकेदार), ओमकार निर्गुडे (आर्किटेक्ट) यांनी तसेच एसएस– २/ बी २३०, सेक्टर २, ऐरोली, नवी मुंबई येथे प्रेमानंद प्रजापती, गुफरान खान (ठेकेदार), ओमकार निर्गुडे (आर्किटेक्ट) यांनी महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे बांधकाम सुरु केले होते.

बबन बाबू पवार, गुफरान खान (ठेकेदार), ओमकार निर्गुडे (आर्किटेक्ट), एसएस– २/ बी २२९, सेक्टर २, ऐरोली, नवी मुंबई व प्रेमानंद प्रजापती, गुफरान खान (ठेकेदार), ओमकार निर्गुडे (आर्किटेक्ट), तसेच एसएस– २/ बी २३०, सेक्टर २, ऐरोली, नवी मुंबई यांच्या अनधिकृत बांधकामांस जी विभाग कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली



होती. संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविने आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले असल्याने या विभागामार्फत दि.०२/०२/२०२६ रोजी अंशःत निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली होती.

तथापी दि.१३/०३/२०२६ रोजी पुनश्च सदर ठिकाणावरील बांधकाम सुरु असल्याचे निदर्शनास आल्याने सदर अनधिकृत बांधकाम ऐरोली विभागाच्या सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी साधना पाटील, सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी ऐरोली, यांचे नियंत्रणाखाली तोडक मोहिमेचे आयोजन करुन सदर अनधिकृत बांधकाम अंशतः निष्कासित करण्यात आले. सदर धडक मोहिमेसाठी जी–विभाग कार्यालयातील अतिक्रमण विभागाचे अधिकारी, कर्मचारी, मजूर, ब्रेकर, गॅसकटर, तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलिस तैनात होते. यापुढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## मुगाव येथील जिल्हा परिषद शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, दौंड :** दौंड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुगाव येथे वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. वार्षिक स्नेहसंमेलनात अंगणवाडी व जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी सर्वांचे मने जिंकून घेतली. अशा कार्यक्रमातूनच विद्यार्थ्यांचे विविध गुण वाढीस लागून सृजनशीलतेचा विकास होतो.

तसेच त्यांची कल्पनाशक्ती वाढीस लागते. सर्व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कलागुण सादर केले असे मत दौंड पंचायत समितीच्या उपसभापती अमृता गिरमकर यांनी व्यक्त केले. देऊळगाव राजे केंद्राच्या केंद्रप्रमुख श्रीमती वैशाली जानराव यांनी याप्रसंगी उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. स्वराज उद्योगसमूहाचे स्वराज यादव यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या व शाळेसमोर ब्लॉक बसवून देण्याचे मान्य केले.

तसेच दिलासा मायक्रो फाउंडेशन चे चेअरमन कैलास चव्हाण यांनी शाळेत भौतिक सुविधा देण्याचे मान्य केले. स्नेहसंमेलन प्रसंगी दौंड तालुक्यातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावच्या पोलीस पाटील राधिकाताई पाहाणे, तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सभासद, ग्रामस्थ व पालक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध लोकगीते, लावणी, देशभक्तीपर गीते, कोळीगीते, शेतकरी नृत्य असे विविध प्रकार सादर करून उपस्थित पालक व ग्रामस्थांची



मने जिंकली. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनातील विविध प्रसंग सादर होत असताना उपस्थितांच्या अंगावर काटा येत होता. इतके सुंदर सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामचंद्र जगताप यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष महेश बागल तसेच संपूर्ण व्यवस्थापन समिती यांनी परिश्रम घेतले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय शिंदे सर व उपशिक्षिका रूपाली शिंदे मॅडम यांनी परिश्रम घेतले. ग्रामस्थांनी देखील विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला भरभरून प्रतिसाद देऊन बक्षिसांचा वर्षाव केला.

## राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या ३९ वा पदवीप्रदान समारंभाचे आयोजन

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१४, राहुरी विद्यापीठ :** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा ३९ वा पदवीप्रदान समारंभ रविवार दि.१५ मार्च, २०२६ रोजी सकाळी १०.०० वा. आयोजीत करण्यात आला आहे. कृषि विद्यापीठातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये होणार्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल व महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलपती जिष्णू देव वर्मा हे उपस्थित असणार आहेत. या पदवीप्रदान समारंभामध्ये देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना मानद डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी देवून सन्मानीत करण्यात येणार आहे. यावेळी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, कृषि मंत्री तथा महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे प्रतिकुलपती दत्तात्रय भरणे आणि वित्त, नियोजन, कृषि, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री मा. ना. ॲड. आशिष जयस्वाल यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याप्रसंगी नवी दिल्ली येथील भाकृअप–भारतीय कृषि संशोधन संस्थेचे माजी संचालक




आणि भाकृअप–भाकृसंसं अनुवंशशास्त्र विभागाचे मानद शास्त्रज्ञ डॉ.अशोक कुमार सिंग हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित राहणार असून ते दीक्षांत भाषण करणार आहेत. यावेळी या समारंभासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे, विद्यापीठ कार्यकारी आणि विद्यापरिषदेचे सदस्य उपस्थित राहणार आहेत.

पदवीप्रदान समारंभात गेल्या वर्षातील विविध विद्याशाखांतील एकुण ४,६०२ स्नातकांना पदवी, पदव्युत्तर, आचार्य पदवीने कुलपती जिष्णू देव वर्मा यांच्याद्वारे अनुग्रहित करण्यात येणार आहेत. त्यात विविध विद्याशाखातील ४,१८२ स्नातकांना पदवी, ३४६ स्नातकांना पदव्युत्तर पदवी तर ७४ स्नातकांना आचार्य पदवीने अनुग्रहित केले जाईल. यावेळी ४२ यशस्वी स्नातकांना मान्यवरांच्या हस्ते सुवर्ण पदके आणि रोख पारितोषिके प्रदान करून गौरविण्यात येणार आहे.

# शहीद वीर जवान बाळकृष्ण निकम यांना अखेरची मानवंदना

## श्रद्धांजली वाहण्यासाठी पाटण ते पिंपळोशी जनसमुदाय लोटला





**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१४, पाटण (सातारा) :** भारत मातेच्या सेवेत शहीद झालेले पाटण तालुक्यातील वीर जवान बाळकृष्ण विलासराव निकम वय ४१ यांच्यावर शासकीय इतमामात त्यांच्या पिंपळोशी या गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे सुपुत्र प्रणव आणि अर्णव यांनी त्यांच्या प्रार्थिवाला भडाग्नी दिली. यावेळी भारतीय सैन्यदल आणि जिल्हा पोलिस जवानांनी अखेरची मानवंदना दिली. शहीद वीर जवान बाळकृष्ण निकम यांना श्ध्दांजली वाहण्यासाठी सातारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील, जिल्हा पोलिस प्रमुख तुषार जोशी, सत्यजितसिंह पाटणकर, पिंपळोशीचे सरपंच विशाल निकम, प्रांताधिकारी सोपान टोंम्पे, तहसिलदार अनंत गुरव, विक्रमबाबा पाटणकर, पोलिस निरीक्षक अविनाश कवठेकर यांसह आजी-माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी, शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी यांनी पुष्पचक्र अर्पण करून श्द्धांजली वाहिली. यावेळी शहीद वीर जवान बाळकृष्ण निकम यांना अश्रू नयनांनी अखेरचा निरोप देण्यासाठी पाटण तालुक्यातून जनसमुदाय लोटला होता.

शहीद वीर जवान बाळकृष्ण विलासराव निकम यांचे पार्थिव शुक्रवारी रात्री विमानाने सिक्कीम येथून पुणे येथे आणण्यात आले. पुणे येथे सैन्यदलातील शासकीय सोपस्कार पार पडल्यानंतर ते पार्थिव रात्री तीनच्या सुमारास पाटणच्या दिशेने मार्गस्थ करण्यात आले. शनिवारी सकाळी साडेसातच्या सुमारास पाटण म्हावशी येथे पोहचल्यानंतर हजारों जनसमुदायाच्या उपस्थित अंत्ययात्रेस सुरुवात झाली.

अंत्ययात्रेच्या दुतर्फा मार्गावर विद्यार्थी - विद्यार्थीनीं रांगा लावून शहीद वीर जवान बाळकृष्ण निकम यांच्या पार्थिवावर पुष्पवृष्टी केली व त्यांना श्द्धांजली वाहिली आणि भारत माता की जय.., शहीद वीर जवान अमर रहे.. च्या घोषणा दिल्या. या अंत्ययात्रेत श्रीमंत दादासाहेब पाटणकर हायस्कूल म्हावशी, कै. ज्ञानोजीराव साळुंखे हायस्कूल पाटण, माने-देशमुख विद्यालय पाटण, नुतन मराठी शाळा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाटण, कल्याणी इंग्लिश मिडीयम स्कूल पाटण, कै.सौ.सुलोचनाबाई पाटणकर कन्याशाळा पाटण, बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मेष्टेवाडी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कवडेवाडी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळोशी या शाळा सहभागी झाल्या होत्या. यासह म्हावशी, पाटण, मेष्टेवाडी, कवडेवाडी, पिंपळोशी येथे हजारो नागरिकांनी उपस्थित राहून पुष्पवृष्टी करुन श्ध्दांजली वाहिली. तर अनेक ठिकाणी महिलांनी शहीद वीर जवान बाळकृष्ण निकम यांचे पार्थिवाचे औक्षण केले.

### पार्थिव पाहताच कुटुंबियांचा एकच हंबरडा...; उपस्थितांचे डोळे पाणावले

● म्हावशी ते पिंपळोशी अंत्ययात्रेच्या शेवटी शहीद वीर जवान बाळकृष्ण निकम यांचे पार्थिव राहत्या घरी नेण्यात आले. या ठिकाणी कुटुंबियांना व नातेवाईकांना त्यांचे मुखदर्शन दिले. यावेळी वीर पत्नी पुनम बाळकृष्ण निकम, मुले प्रणव - अर्णव, आई लक्ष्मीबाई, वडील विलासराव, भाऊ शिवराज, बहिण रुपाली यांनी शहीद वीर जवान बाळकृष्ण निकम यांचे पार्थिव पहाताच एकच हंबरडा फोडला हे दृश पाहताना उपस्थितांचे डोळे पाणावले होते.

### पिंपळोशी येथील तरुणांचे श्रमदान; प्रशासकीय यंत्रणेत तहसिलदार अनंत गुरव यांची तत्परता

● दिनांक ११ मार्च २०२६ रोजी वीर जवान बाळकृष्ण निकम हे शहीद झाल्याची बातमी पिंपळोशी- पाटण येथे धडकताच पिंपळोशी येथे नातेवाईक, पैपाहुणे संबंधितांची गर्दी होत होती. पार्थिव शनिवारी पिंपळोशी येथे येणार याची कल्पना स्थानिक प्रशासकीय यंत्रेणेला वरिष्ठांकडून करण्यात आली होती. जिल्हा सैनिक बोर्ड, स्थानिक पोलीस यंत्रणा यांनी इतर प्रशासकीय यंत्रणेशी समन्वयक साधून व त्या ठिकाणी प्रत्यक्ष हजर राहून अंत्ययात्रा व अंत्यविधीची पुर्व तयारी करण्याचे आदेश होते. मात्र या यंत्रणेने केवळ पिंपळोशी येथे येवून ग्रामस्थांना सुचना देण्याचेच कार्य केले होते. याचा संताप ग्रामस्थ व्यक्त करत असताना गावातील तरुणांनी प्रशासकीय यंत्रणेच्या मदतीची वाट न पाहता प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. स्थानिक वस्तुस्थिती तहसिलदार अनंत गुरव यांना माहिती पडताच त्यांनी तत्परतेने पिंपळोशी गाठले. आणि संबंधित प्रशासकीय यंत्रेणेला संपर्क करुन त्यांना फिल्डवर बोलवून घेतले रात्री उशिरा पर्यंत तेथे स्वतः थांबून अंत्यविधी व अंत्ययात्रे कामकाज संबंधितांकडून करुन घेतले. तहसिलदार अनंत गुरव यांच्या या तत्परतेमुळे ग्रामस्थांनी त्यांचे समाधान व्यक्त केले.

### पालकमंत्र्यांची अंत्यविधीला अनुपस्थिती; उपस्थितांच्या चर्चेचा विषय

● भारत मातेच्या सेवेत शहीद झालेले वीर जवान बाळकृष्ण निकम हे पालकमंत्र्यांच्या मतदार संघातील आहेत. शहीद वीर जवान यांच्या अंत्यदर्शनासाठी जिल्ह्यात चार मंत्री असताना जिल्ह्यातील कोणत्या मंत्र्यांनी उपस्थिती दर्शविली नाही. पालकमंत्री तरी येथील अशी अपेक्षा सर्वांनाच होती. एरवी मतदार संघातील सर्वांच्या सुखदुःखात सहभागी होणारे त्यांचे कुटुंबीय अथवा कुटुंबातील प्रतिनिधी तरी हजर राहतील अशी अपेक्षा उपस्थितांना होती मात्र त्यांच्या कुटुंबातील कोणीच हजर न राहिल्याने उपस्थित यांच्या चर्चेचा विषय झाला. अखेर सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास पालकमंत्री शंभुराज देसाई यांनी पिंपळोशी येथे निकम कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले.

### अनेक अधिकाऱ्यांच्या दांड्या

●पाटण तालुक्यातील जवान शहिद होतो. त्यासाठी जिल्हातून अधिकारी किंवा स्थानिक अधिकारी, सामाजिक, राजकीय, नागरिक यांनी याठिकाणी येणे आपले कर्तव्य समजले परंतु काहीनां इकडे येणे ही कदाचित जड झाले. पाटणची उपविभागीय पोलीस अधिकारी जागा रिक्त आहे. अतिरिक्त चार्ज कराडला दिला आहे. त्यामुळे कराडचे उपविभागीय पोलीस अधिकारी पाटणला फिरकले नाही तसेच, पाटणचे गटविकास अधिकारी यांनी ही शहीद जवानास मानवंदना देण्यासाठी दांडी मारली.

# थोडक्यात

## गॅसअभावी अहिल्यानगर एमआयडीसीमधील ३०० उद्योग ठप्प

### ३ हजार कामगारांवर बेरोजगारीची कुऱ्हाड



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, अहिल्यानगर :** आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाचे पडसाद आता स्थानिक उद्योगांवर उमटू लागले आहेत. इंडस्ट्रियल गॅसचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे अहिल्यानगर एमआयडीसी मधील तब्बल ३०० उद्योगांचे चाके थांबले आहेत. त्यामुळे जवळपास ३ हजार कामगारांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळण्याची भीती व्यक्त होत आहे. गेल्या चार दिवसांपासून गॅस उपलब्ध नसल्याने उत्पादन प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली आहे. एमआयडीसी परिसरातील अनेक उद्योगांमध्ये उत्पादनासाठी इंडस्ट्रियल गॅस अत्यावश्यक असतो. विशेषतः इलेक्ट्रिकल मोटार निर्मिती करणाऱ्या कंपन्यांमध्ये गॅसवर आधारित प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर केली जाते. मात्र गॅसचा पुरवठा खंडित झाल्याने मोटार तयार करण्याचे विभागच बंद पडले आहेत.

काही कंपन्यांमध्ये छोट्या प्रोजेक्टअंतर्गत सुमारे ७००मोटारी, तर मोठ्या कंपन्यांमध्ये ७ हजारांपर्यंत मोटारींचे उत्पादन केले जाते. पण गॅसच्या कमतरतेमुळे उत्पादन पूर्णपणे ठप्प झाल्याने उद्योगांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. उद्योगांतील कामकाज थांबल्याने ३ हजार कामगारांवर बेरोजगारीचे संकट ओढवले आहे. ही परिस्थिती अशीच राहिली तर हजारो कामगारांच्या रोजगारावर गदा येण्याची शक्यता उद्योजकांनी व्यक्त केली आहे.

**हॉटेल व्यवसाय बंद होण्याची शक्यता**

हॉटेल व्यवसायिकांपुढे मोठे संकट उभे राहिले आहे. सध्या काही व्यवसायिक उपलब्ध गॅस सिलिंडरवर पदार्थ बनवत आहेत. मात्र, येत्या तीन दिवसांत नवीन सिलिंडर उपलब्ध न झाल्यास अनेक हॉटेल्स बंद ठेवण्याची वेळ येऊ शकते. प्रशासन गॅस टाक्या उपलब्ध असल्याचा दावा करत असले तरी प्रत्यक्ष टाक्या मिळत नसल्याचे हॉटेल व्यवसायिकांचे म्हणणे आहे.

## महाराजस्व समाधान शिबिरात खा.धैर्यशील पाटलांची उपस्थिती

### खासदार यांच्या हस्ते विविध शासकीय दाखल्याचे वाटप



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१४, पेण (रायगड) :** हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणेने राज्य शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' अभियानाचा दुसरा टप्पा आज कामार्ली महसूल मंडळातील मांगरुळ येथील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात सकाळी ९.३० वाजता राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील, प्रांत अधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ, बाजार समिती सभापती महादेव मानकर, खरेदी विक्री संघ चेअरमन रघुनाथ तथा बापू दळवी यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिराचे शानदार उद्धाटन झाले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे रयतेप्रती असणारे प्रेम जिव्हाळा आपुलकी आणि कल्याण राज्य निर्मिती याची प्रेरणा घेऊन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सामान्य जनतेला एकाच ठिकाणी महसूल कृषी शैक्षणिक व आदिवासी बांधवांना लागणारे दाखले विना तक्रार व तातडीने देण्याचा हा स्तुत्य उपक्रम आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांना याचा पूरेपूर लाभ मिळत आहे हे या महाराजस्व समाधान शिबिरात दिसून येते. आपण सर्वानी याचा लाभ घ्यावा असे खासदार धैर्यशील पाटील यांनी मार्गदर्शनपर भाषणात सांगितले. यावेळी त्यांच्या व मान्यवरांच्या हस्ते यावेळी विविध शासकीय दाखल्याचे लाभार्थींना वाटप करण्यात आले.छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबीराचा हा दुसरा टप्पा मांगरुळ गावातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात पार पडला.

यावेळी नायब तहसीलदार नितीन परदेशी,नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, मावळा प्रतिष्ठानचे मंगेश दळवी, जिल्हा परिषद सदस्या ताई जोमा दरवडा, जिल्हा परिषद सदस्य जनार्दन भस्मा, पंचायत समिती सदस्या कमळ पवार, बाजार समिती संचालक जयंत नारकर कामार्ली माजी सरपंच गजानन मोरे वाक्रुळ सरपंच गणेश गायकर, बाळगंगा संघर्ष समिती अध्यक्ष अविनाश पाटील, याशिवाय मंडळ अधिकारी ,तलाठी,कृषी सहायक, आदिवासी प्रकल्प विभाग कर्मचारी, आरोग्य कर्मचारी, कोतवाल ,पोलीस पाटील, ग्रामपंचायत कर्मचारी, व विभागातील ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती.शिबीराचे आयोजन सुरेख करण्यासाठी मावळा प्रतिष्ठानचे रुपेश दळवी आणि ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. शिबिरात ७/१२उतारे, फेरफार नोंदी, नामांतरण व वारस नोंद प्रक्रिया, उत्पन्न, अधिवास व जातीचे दाखले, अकृषिक रूपांतरणासाठी सुलभ प्रक्रिया, डिजिटल स्वाक्षरीयुक्त सातबारा उताऱ्यांची वैधता, तुकडेबंदी कायद्यातील सुधारणा तसेच एकाचवेळी अधिमूल्य भरण्याची सोपी व्यवस्था यांचा शिबीर याअंतर्गत समावेश केलेला होता.

एक खिडकी योजना' पद्धतीने सर्व महसूल अधिकारी एकाच ठिकाणी उपलब्ध राहणार असल्याने नागरिकांच्या विविध महसुली कामांचे तातडीने निराकरण होणार असून या अभियानामुळे महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख व गतिमान होईल, महसुली तक्रारींचे तातडीने निवारण करणे, प्रलंबित प्रकरणांना गती देणे तसेच प्रशासन व नागरिक यांच्यात थेट संवाद प्रस्थापित करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

**- प्रवीण पवार (प्रांत तथाविभागीय महसूल अधिकारी, पेण)**

# पारनेर बाजार समितीच्या सभापती व उपसभापतींचे राजीनामे

## पारनेर बाजार समितीला मिळणार नवे कारभारी




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या राजकारणात पुन्हा एकदा हालचाली सुरू झाल्या असून कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किसनराव सबाजीराव रासकर व उपसभापती किसनराव पंढरीनाथ सुपेकर यांनी आपल्या पदांचे राजीनामे दिले आहेत. त्यामुळे आता बाजार समितीला नवे कारभारी मिळणार असल्याचे बोलले जात आहे. गेल्यावर्षी मार्च महिन्यात या दोन्ही ज्येष्ठ संचालकांना सभापती-उपसभापती पदाची संधी मिळाली होती. आता नवीन संचालकांना संधी मिळावी, या हेतूने त्यांनी राजीनामे दिले असून, नवीन पदाधिकारी कोण होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

उपसभापती किसनराव सुपेकर यांनी नुकताच झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत आपल्या पदाचा राजीनामा सभापती किसनराव रासकर यांच्याकडे सुपूर्द केला, सभापती रासकर यांनी तो तात्काळ मंजूर केला. त्यानंतर सभापती किसनराव रासकर यांनी जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्याकडे राजीनामा दिला. जिल्हा उपनिबंधकांच्या आदेशाने लवकरच सभापती-उपसभापती निवडीचा कार्यक्रम जाहीर केला जाणार आहे.

### "शरद पवार गटाचे संख्याबळ वाढले"

बाजार समितीत महाविकास आघाडीची सत्ता असून, १८ पैकी १७ संचालक हे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) व शिवसेना ठाकरे गटाचे आहेत. अजित पवार गटाचे अशोक सावंत हे एकमेव संचालक आहेत. तीन बैठकांना गैरहजर राहिल्याने अजित पवार गटाचे संचालक प्रशांत गायकवाड यांना जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवशे यांनी अपात्र ठरवले होते. त्यांच्या जागी रा. या. औटी यांची बिनविरोध निवड झाली असून, त्यामुळे शरद पवार गटाचे संख्याबळ वाढले आहे.

# ३१ मार्च पर्यंत पाणी बिल भरा; अन्यथा दंडात्मक कारवाई होईल

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१४, नवी मुंबई :** सिडको प्रशासनिक क्षेत्रातील ज्या ग्राहकांची पाणीपट्टी देयके प्रलंबित आहेत त्यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत थकीत देयकांचा भरणा करण्याचे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले असून, विहित मुदतीमध्ये प्रलंबित देयकांचा भरणा करण्यास असमर्थ ठरणाऱ्या ग्राहकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येऊन पाणी पुरवठा खंडित करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

सिडको प्रशासनिक क्षेत्रातील गावांना आणि नोडना सिडकोतर्फे पाणी पुरवठा करण्यात येतो. पाणी पुरवठा नियमित आणि अखंडित करण्यासाठी तसेच देखभाल व दुरुस्तीची कामे नियमितपणे करण्यासाठी ग्राहकांनी पाणीपट्टी देयकांचा भरणा वेळेवर करणे आवश्यक आहे. याकरिता ज्या ग्राहकांची पाणीपट्टी देयके प्रलंबित आहेत त्यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत थकबाकीचा भरणा करण्याचे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आला आहे. विहित मुदतीत थकलेली पाणी देयके न भरल्यास संबंधित ग्राहकांवर, सिडकोच्या नियमानुसार दंडात्मक कारवाई करून त्यांचा पाणी पुरवठाही खंडित होऊ शकतो, असा इशार देखील सिडकोतर्फे देण्यात आला आहे.

ग्राहकांना पाणी देयके ऑनलाइन पद्धतीने, अधिकृत संकलन केंद्रांवर किंवा सिडको कार्यालामध्ये भरण्याचे पर्याय उपलब्ध आहेत. तसेच पाणीपट्टी देयकामध्ये काही त्रुटी अथवा शंका असल्यास संबंधित सिडको कार्यालयासोबत त्वरित संपर्क साधण्याचे सिडकोतर्फे कळविण्यात आले आहे. जेणेकरून या संदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. संबंधित ग्राहकांनी पाणीपट्टी देयकांचा भरणा वेळेवर करून पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सिडकोला सहकार्य करण्याचे आवाहन सिडकोने केले आहे.